सांगोला नगरपरिषद, सांगोला जिल्हा - सोलापूर
E-mail- comcsangola@gmail.com

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act
आपली सेवा आमचे कर्तव्य

## संगणक विभाग
## जाहिर निविदा सुचना क्र. २ सन-२०२५-२६

सांगोला नगरपरिषद कार्यालयाकडील कार्यालयीन कामकाजासाठी खालील नमूद केलेल्या सेवा सन २०२५-२६ या सालाकरीता बाह्ययंत्रणेद्वारे घेणेत येणार आहेत. सदर कामी इकडील अटी व शर्ती पूर्ण करू शकणा-या सेवा पुरवठादार यांचेकडून निविदा मागणी करणेत येत आहे.या निविदेच्या अटी व शर्ती शासनाच्या https://sangolamc.com या संकेतस्थळावर पाहता येतील.

| अ.क्र. | कामाचा तपशील | अंदाजे खर्च (रक्कम रू.) | कामाचा कालावधी | बयाणा रक्कम | निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | सांगोला नगरपरिषद कार्यालयाकडील कार्यालयीन कामकाजासाठी संगणकचालक यांची सेवा पुरविणे | ८,६९,०००/- | १ वर्ष | रु.८,७००/- | रू.१५००/- |

| कामाचे नाव | निविदा फॉर्म विक्री व जमा करण्याचा दिनांक | निविदा भरण्याचा शेवटचा दिनांक | निविदा उघडणेचा दिनांक |
|---|---|---|---|
| सांगोला नगरपरिषद कार्यालयाकडील कार्यालयीन कामकाजासाठी संगणकचालक यांची सेवा पुरविणे | दि.२७/०२/२०२५ ते दि. १३/०३/२०२५ वेळ-सायं-५.०० वाजेपर्यंत | दि.१३/०३/२०२५ वेळ-सायं-५.०० वाजेपर्यंत | दि. १७/०३/२०२५ वेळ-सकाळी-११.०० वाजता |

**शर्ती व अटी :-**

१) कामाविषयी आपणास अधिक माहिती संगणक विभाग,सांगोला नगरपरिषद,सांगोला यांचेकडून मिळेल.

२) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या दराप्रमाणे सर्व कर कपातीच्या सूचना निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

३) संबंधीत सेवेसाठी आवश्यक ते मनुष्यबळ हे पुरवठा करणा-या निविदाधारकांचे असल्याने, संबंधीत मनुष्यबळासाठी द्यावयाचे मासिक मानधन, संबंधीत निविदाधारकच अदा करील, याकरीता संबंधीत निविदाधारकास कोणत्याही प्रकारचे आगाऊ अग्रिमची मागणी करता येणार नाही.

४) सदर सेवांसाठी इकडे पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळातील कोणत्याही व्यक्तींकडून सदर सेवेबाबत भविष्यात कोणत्याही प्रकारे सेवाविषयक लाभांसाठी हक्क अगर दावा, शासनावर अथवा सांगोला नगरपरिषदेवर प्रस्थापित करता येणार नाही.

५) कोणत्याही परिस्थितीत एखादी किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे. त्यासाठी कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.

६) मनुष्यबळ पुरवठादार यांनी शासन नियमानुसार कामगार भविष्यनिर्वाह निधी (E.P.F.) व ई.एस.आय.सी. ची रक्कम आपण पुरवठा करत असलेल्या मनुष्यबळाच्या खात्यावर नियमितपणे भरणे अनिवार्य राहील, व त्याची प्रत ज्या-त्या महिन्यात नगरपरिषदेकडे सादर करणे आवश्यक राहिल.

७) वरील अटी व शर्ती मान्य असणाऱ्या पुरवठादार/संस्था यांनीच आपली निविदा सादर करावी.

८) वरील अटी व शर्तीचे उल्लंघन केले असल्याचे आढळल्यास, संबंधीत निविदाधारक फौजदारी कारवाईस पात्र राहिल आणी त्याची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

९) निविदा दिनांक-१७/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा मुख्याधिकारी यांच्यासमोर उघडणेत येतील, त्यावेळी संबंधित निविदाधारकांनी उपस्थित रहावे.

**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**
**सांगोला नगरपरिषद,सांगोला**

## निविदा सादर करण्याची पद्धत व इतर आवश्यक अटी व शर्ती

१) निविदा धारकाने निविदा सादर करताना दोन लिफाफा पद्धतीचा अवलंब करावा,त्यापैकी

**पहिल्या लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक राहिल.**

१) संस्था नोंदणीकृत असल्याची व नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण केल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत. (शॉप ॲक्ट लायसन/ग्रामसेवकाचा दाखला)

२) मजुर करार नियम १९७० नुसार कंत्राटी कामगार परवाना नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत (कॉन्ट्रॅक्ट लेबर लायसन)

३) पॅनकार्डची साक्षांकित प्रत व गेल्या तीन वर्षातील आयकर परताव्याच्या प्रती

४) वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

५) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ अंतर्गत नोंदणी केल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत आणि मागील दोन वर्षांची वर्गणी भरल्याची साक्षांकित प्रत (सन-२०२२-२३ व २०२३-२४)

६) काळ्या यादीत नाव समाविष्ट नसल्याबाबतचे, तसेच कोणत्याही ठिकाणी पोलीस चौकशी/तपास न्यायालयीन प्रकरणे चालू नसल्याचे सहीनिशी हमीपत्र

७) मागील दोन वर्षांच्या कालावधीत किमान २ कार्यालयांना कंत्राटी तत्वावर खाली नमूद केलेल्या पदांसाठी मनुष्यबळ पुरविले बाबतचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र

८) निविदा बयाणा रक्कम रू. ८,७००/- व ई-निविदा फॉर्म शुल्क रू. १५००/- भरणा केल्याची पावती

९) व्यवसाय कर अधिनियमाखाली नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत आणी मागील तीन वर्षाचा व्यवसाय कर भरले बाबतच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती.

१०) ई.एस.आय.सी.ची नोंदणी केलेबाबतची प्रत

११) भागीदारी असल्यास नोंदणीकृत भागीदारी पत्र

१२) या संविदेमध्ये (निविदेत) कोणत्याही पदाधीकारी यांचा सहभाग नसलेबाबतचे प्रमाणपत्र (परिशिष्ट-अ) व सत्यप्रतीज्ञा पत्र (परिशिष्ट-१) (रू.५००/- च्या स्टँप पेपरवरील)

वरील सर्व कागदपत्रे लिफाफा १ मधून सादर करावीत

**दुसऱ्या लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक राहिल.**

१) वित्तीय लखोटा प्रपत्र क्र.१ भरणे आवश्यक आहे.**(प्रति व्यक्ती प्रति दिवस सेवा आकार)**

२) शासनाचे किमान वेतन कायदा, १९४८ मधील तरतुदिनुसार सद्यस्थितीत शासनाने निर्धारित केलेल्या वेतन व इतर भत्ते दरावर(सर्व करांसहित) मान्य निविदा दरांप्रमाणे सेवा शुल्क देय होतील.

## पद निहाय शैक्षणिक अर्हता व कागदपत्रांचा तपशील

| अ.क्र. | पदाचे नाव | आवश्यक शैक्षणिक अर्हता, प्रमाणपत्र व कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १ | संगणक चालक | उमेदवार कोणत्याही शाखेतील पदवी/पदविकाधारक आणी संगणक हाताळण्याचे प्रत्यक्ष ज्ञान आवश्यक (किमान MS.CIT कोर्स उत्तीर्ण) आहे. तसेच मराठी, इंग्रजी टायपिंग परीक्षा उत्तीर्ण असणे अनिर्वाय आहे. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे |

**इतर आवश्यक अटी व शर्ती:-**

१) मंजूर निविदाधारकाकडून प्रथम आवश्यक त्या किंमतीच्या शासकीय स्टँप पेपरवर निविदेतील व इतर अटी व शर्ती सह इकडील नमुन्यामध्ये बंधपत्र लिहून घेण्यात येईल, व ते पूर्ण करून देणे बंधनकारक राहील.

२) इकडील कामाचा आदेश मिळालेनंतर त्या आदेशात नमूद असणारे इकडील आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध असल्याचा तपशील (संबंधीत व्यक्तींची नावे, संपूर्ण पत्ता तसेच वर नमूद केल्याप्रमाणे त्यांची शैक्षणिक अर्हता, संगणक व तांत्रिक अर्हता व अनुभव याबाबतची सर्व माहिती) नगरपरिषदेकडे सादर करणे आवश्यक राहील.

३) मंजूर निविदाधारक (पुरवठादार) यांना इकडील विभागप्रमुख यांनी वेळोवेळी केलेल्या सुचानांप्रमाणेच त्यांनी आपल्या मनुष्यबळास (कंत्राटी कर्मचारी) यांना तशा सुचना देऊन नगरपरिषद कार्यालयाकडील कामे करणे आवश्यक आहे.

४) याकामी नियमाप्रमाणे आकाराला जाणारा आयकर व शासनाचे इतर अनुदेय असलेले व शासनाने नव्याने काही कर लावलेस ते सर्व कर, संबंधीत पुरवठादारांचे होणारे बिलातून कपात करणेत येतील. त्यासाठी वाढीव दराची अथवा भरपाईची रक्कम संबंधीत पुरवठादार यास मागणी करता येणार नाही.

५) गरजेच्या वेळी आवश्यक त्या कामा नुसार संबंधीत कंत्राटी कर्मचारी यास शासकीय सुट्टीच्या दिवशी सुध्दा काम करावे लागेल व त्याचा वेगळा मेहनताना अदा केला जाणार नाही.

६) संबंधित नियुक्त मनुष्यबळाचा (कंत्राटी कर्मचारी यांचा) दरमहाचा मोबदला शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या किमान वेतन कायदा, १९४८ नुसार देण्याची सर्वस्वी जाबाबदारी मंजूर निविदाधारकाची राहील. इकडील कामावर नियुक्त करण्यात येणाऱ्या सर्व कंत्राटी कर्मचारी यांना शासन नियमाप्रमाणे देय असलेले किमान वेतन व इतर भत्ते तसेच भविष्यनिर्वाह निधी, ई.एस.आय.सी. रक्कम देणेची जबाबदारी संबंधीत मंजूर निविदाधारक (पुरवठादार) यांचेवर बंधनकारक राहील. त्याबाबतची कोणतीही जबाबदारी नगरपरिषदेची असणार नाही.

७) निविदाधारकाने भरून दिलेला निविदेतील दर हा इकडील सर्व अटी व शर्ती तसेच शासनाकडील व नगरपरिषदेकडील सर्व करांसह भरून निविदा भरलेली आहे, असे समजण्यात येईल. त्यानंतर कोणत्याही स्वरूपात तक्रार एकली जाणार नाही.

८) शासनाच्या वेळोवेळी येणाऱ्या सुचनेप्रमाणे सर्व कर कपातीचे दर संबंधीत निविदाधारकास बंधनकारक राहतील.

९) मंजूर निविदाधारक काम करणेस असमर्थ ठरल्यास अथवा दिलेल्या सुचनांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास निविदाधारकाला काम करावयाचे नाही असे समजून निविदा एकतर्फी रद्द करण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

१०) वरील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास निविदाधारक फौजदारी कारवाईस पात्र राहिल, तसेच त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

११) एखादी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे.

१२) सदर सेवा पुरवठ्याची मुदत हा कार्यदिश दिल्यापासून १ वर्ष मुदतीकरीता असेल, मुदतीनंतर काही कारणास्तव आवश्यकता भासलेस मुदतवाढीबाबत सदर निविदेमधील मंजूर दरानुसारच पुढील मुदतीच्या मान्यतेबाबत विचार करणेत येईल.

१३) निविदा मंजुरीचा आदेश मिळालेनंतर सात दिवसात १% इतकी सुरक्षा अनामत रक्कम पुरवठादारास भरावी लागेल, उर्वरीत ९% रक्कम, संबंधीत मंजुर पुरवठादाराच्या देयकामधून कपात करून घेतली जाईल.

१४) सदर सुरक्षा अनामत म्हणून कपात केलेली रक्कम ही बिनव्याजी ठेवून घेण्यात येवून, या निविदेचा संपूर्ण कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुरवठादार यांच्या मागणीनुसार त्यांचे कामाचे नगरपरिषदेकडील होणाऱ्या मुल्यमापनाअंती रक्कम परत करण्यात येईल.

१५) पुरवठादारास शासन नियमानुसार इकडे कामावर सेवेसाठी दिलेल्या कंत्राटी कर्मचारी यांच्या खात्यावरील कामगार भविष्य निर्वाह निधीची E.P.F. रक्कम व ई.एस.आय. सी. भरलेल्या रक्कमेच्या पावतीची प्रत नगरपरिषदेकडे दरमहा सादर करावी लागेल. सदर रक्कमा भरलेल्या पावती नगरपरिषदेकडे दरमहा सादर केल्याशिवाय सदर कामाचे बिल दरमहा अदा केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**
**सांगोला नगरपरिषद,सांगोला**